# नोंदणी महानिरीक्षक व
# मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांचे कार्यालय

नविन प्रशासकिय इमारत, पुणे-४११ ००१.

क्र.का.५/मुद्रांक-२०१२/ई-स्टँम्प/प्र.क्र. /१२/
दिनांक - /०७/२०१२.

**विषय :- ई-स्टँम्पचे वापराबाबत....**

## परिपत्रक

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, अनेक ठिकाणी स्टॉक होल्डिंग कार्पोरेशन इंडिया लि. यांनी जारी केलेल्या ई-स्टँम्पपासून दस्तलेखनाची सुरुवात केली जात नाही, ई-स्टँम्प हा कोराच ठेवला जातो. नोंदणी अधिकारी व अन्य अधिकारी यांचे समोर असा कोरा ई-स्टँम्पचा दस्तऐवज सादर केल्यावर ते याबाबत कोणतीही हरकत घेत नाहीत. सदरची बाब मुद्रांक अधिनियमांचे तरतुदींशी विसंगत आहे. ई-मुद्रांक हा मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम २(क) मध्ये दिलेल्या उमट मुद्रांकाचे व्याख्येत येतो व कलम १३ मध्ये त्याचे वापराबद्दलची कार्यपध्दती विहीत केली आहे. सदर कार्यपध्दतीनुसार 'उमट मुद्रांकांचे बाबतीत दस्तऐवजाचा काही मजकुर मुद्रांकांचे दर्शनी भागावर लिहीणे बंधनकारक आहे. उक्त कलम १३ मधील तरतुदीचा भंग झाल्यास संबंधित दस्तऐवज योग्य मुद्रांकित आहे असे मानता येणार नाही अशी तरतुद कलम १५ मध्ये आहे. तरी कायद्यातील या तरतुदींचे गांभिर्याने पालन होत नसल्याचे दिसून येते.

यास्तव याव्दारे सर्व संबंधीतास कळविण्यात येते की, ई-मुद्रांक अथवा अन्य कोणत्याही उमट मुद्रांकांचे बाबतीत, कायद्यातील उक्त तरतुदींचे काटेकोर पालन होईल असे पहावे .

**सही/-XXX**
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

प्रत :-
१) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई
२) सर्व विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
३) सर्व सहजिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी
४) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.

**निर्गमित.**

**सह नोंदणी महानिरीक्षक व**
**मुद्रांक अधिक्षक (मुख्यालय), म.रा. पुणे.**